# अर्थशास्त्र

## बी.ए. द्वितीय वर्ष (सेमिस्टर IV)

- डॉ. प्रज्ञा बागडे

-

## राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी अधिकोषाच्या प्रगतीचे टिकात्मक मूल्यमापन

## (Critical Appraisal of the Commercial Banking in India after Nationalization)

भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी अधिकोषण व्यवस्थेची स्थिती फारशी चांगली नव्हती. देशात अनेक लहान लहान व्यापारी अधिकोष स्थापन झालेले होते. अप्रामाणिक, पुराणमतवादी व अधिकोषाच्या विकासाच्या बाबतीत निरुत्साही लोकांच्या हातात व्यापारी अधिकोषाची सूत्रे होती. अधिकोषाच्या व्यवहारात कमीत कमी जोखीम स्वीकारण्याच्या वृत्तीमुळे व्यापारी अधिकोषाचा फारसा प्रसार होऊ शकला नाही. हे अधिकोष प्रामुख्याने शहरी भागापुरतेच मर्यादित होते. कृषी क्षेत्र व औद्योगिक क्षेत्राला दिलेली कर्जे अगदीच नाममात्र होती. त्यामुळे व्यापारी अधिकोषाच्या प्रगतीच्या दृष्टीकोनातून दोन महत्वपूर्ण पावले उचलण्यात आली. त्यातले पहिले पाऊल १९४९ मध्ये अधिकोषण नियमन अधिनियम मंजूर करण्यात आला. या अधिनियमामुळे रिझर्व्ह बॅंकेला व्यापारी अधिकोषावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार प्राप्त झाले. दुसरे म्हणजे १ जानेवारी १९४९ ला रिझर्व्ह बॅंकेचे राष्ट्रीयीकरण सुद्धा करण्यात आले.

१९४९ नंतर भारतीय व्यापारी अधिकोषण व्यवस्थेचा जो विकास झाला त्याचे दोन भागात स्पष्टीकरण करता येते. प्रथम भाग १९४९ पासून व्यापारी अधिकोषाच्या

राष्ट्रीयीकरणापर्यंतचा म्हणजेच १९६९ पर्यंतचा व दुसरा भाग १९६९ मध्ये व्यापारी अधिकोषांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतरचा कालावधी.

**स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचा व्यापारी अधिकोषाचा विकास (१९४९-१९६९)**

भारतात अधिकोषांच्या विकासात १९४९ चा अधिकोषण नियमन कायदा हा एक महत्वाचा टप्पा होय. हा अधिनियम पारित झाल्यानंतर भारतीय अधिकोषणाचा अनेक अर्थाने विकास झाला. अधिकोषांच्या भौगोलिक सीमा विस्तृत झाल्या. अधिकोषांच्या कार्यपद्धतीत बदल होऊन अधिकोषांचा ढांचा बदलला. या सर्व बदलांवरुन असे दिसून येते की अधिकोषण क्षेत्रात प्रगती होत आहे. १९४९ च्या अधिनियमामुळे रिझर्व्ह बॅकेला अधिकोषण व्यवस्थेत अनेक संरचनात्मक बदल करणे शक्य झाले परंतु याच काळात अनुसूचित अधिकोषांची संख्या १९४९ ते १९६९ या कालावधीत ९४ पासून ७६ पर्यंत घटली आणि गैरअनुसूचित अधिकोषाचे अधिकोषण व्यवस्थेतील महत्व कमी झाले. व्यापारी अधिकोषांच्या सर्व प्रकारच्या ठेवींमध्ये वाढ झाली यात प्रामुख्याने मागणी ठेवी पेक्षा मुदत ठेवींमध्ये जास्त प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. १ जुलै १९५५ ला सरकारने त्यावेळेच्या इम्पिरिअल बॅकेचे राष्ट्रीयीकरण करुन तिला स्टेट बॅक ऑफ इंडिया असे नाव दिले. या बॅकेच्या स्थापनेमुळे भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील अधिकोषांच्या विकासाला चालना मिळाली. १९५९-६० मध्ये स्टेट बॅक ऑफ इंडियाच्या गटातील अधिकोषांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

स्टेट बॅकेच्या स्थापनेमुळे अधिकोषण क्षेत्राची तीव्र गतीने प्रगती झाली. या काळात व्यापारी अधिकोषांच्या कर्ज वाटपाच्या धोरणात बदल झाला. १९४९ नंतर व्यापारी अधिकोष मध्यम अवधी व दीर्घावधी कर्जे देऊ लागले. पूर्वी व्यापारी अधिकोषांद्वारे दिल्या जाणाऱ्या एकूण कर्जात व्यापारासाठी दिलेल्या कर्जाचे प्रमाण जास्त आणि उद्योगांना दिल्या जाणाऱ्या

कर्जाचे प्रमाण कमी. १९५१ मध्ये व्यापारी अधिकोषांनी दिलेल्या एकूण कर्जात उद्योगांना दिलेल्या कर्जाचे प्रमाण ३४ टक्के होते. ते १९६८ मध्ये ६८ टक्क्यांपर्यंत वाढले होते. या कालावधीत व्यापारासाठी दिलेल्या कर्जाचे एकूण कर्जातील प्रमाण ३६ टक्क्यांपासून १९ टक्केपर्यंत घटले. १ जानेवारी १९६२ रोजी ठेव विमा नियमाची स्थापना झाली. त्यामुळे ठेवीदारांचा अधिकोषांवरील विश्वास वाढला. यामुळे ठेवींच्या संख्येत वाढ झाली.

**व्यापारी अधिकोषांचे राष्ट्रीयीकरण (Nationalisation of Commercial Banks)-**

व्यापारी अधिकोष ही एक लाभ प्राप्त करणारी संस्था असून जास्तीत जास्त लाभ प्राप्त करणे हे अधिकोषांचे उद्दिष्ट असते. ज्या उद्योगांमध्ये व्यक्तीगत स्वार्थ गुंतलेला असतो अशाच उद्योगांना कर्ज पुरवठा केला जातो. त्यामुळे आर्थिक सत्तेचे केंद्रिकरण होते. सामाजिक हिताच्या दृष्टीकोनातून जे उद्योग महत्वाचे असतात अशा उद्योगांचा विकास होणे आवश्यकच असते. परंतु असे झाले नाही. त्यामुळे सरकारने व्यापारी अधिकोषांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पुढील पाऊले उचलली.

१) सल्लागाराच्या स्वरुपात राष्ट्रीय प्रत्यय परिषदेची स्थापना केली.

२) आवश्यक बॅंकिंग अधिनियम पारित केले.

या दोघांच्या द्वारे सरकारने अधिकोषांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. यामुळे नवीन अशा बॅंकिंच्या प्रथा अस्तित्वात येतील असे सरकारला वाटत होते. परंतु असे झाले नाही. त्यामुळे अधिकोषांचे राष्ट्रीयीकरण केल्याशिवाय अधिकोष आपल्या जबाबदाऱ्या पार पाडू शकणार नाही. असे सरकारला वाटू लागले. त्यामुळे १९ जुलै १९६९ ला देशातील १४ प्रमुख व्यापारी अधिकोषांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. राष्ट्रीयीकरण म्हणजे सरकारने एखादा उद्योग किंवा व्यवसाय आपल्या ताब्यात घेणे होय. राष्ट्रीयीकरणामुळे त्या उद्योगांची किंवा व्यवसायाची मालकी, धोरण निर्धारण, संचालन आणि नियंत्रण ही कार्ये सरकारला

पार पाडावी लागतात. विदेशी अधिकोष व ज्यांची जमापुंजी ५० कोटी रु. पेक्षा कमी होती अशा अधिकोषांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले नाही. राष्ट्रीयीकृत अधिकोष देशाच्या अर्थव्यवस्थेला गतिमान करतील व त्यामुळे आर्थिक विकासाचा वेग वाढेल असे सरकारला वाटत होते. १९८० च्या काळात ज्या व्यापारी अधिकोषांच्या ठेवी ह्या २०० कोटीपेक्षा जास्त आहे अशा आणखी ६ व्यापारी अधिकोषांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

**व्यापारी अधिकोषाच्या राष्ट्रीयीकरणाच्या समर्थनार्थ मुद्दे**

भारताच्या माजी पंतप्रधान श्रीमती इंदीरा गांधी यांनी ज्यावेळेस अधिकोषांच्या राष्ट्रीयीकरणाचा निर्णय घेतला त्यावेळी राष्ट्रीयीकरणाच्या समर्थनार्थ काही मुद्दे मांडले ते पुढीलप्रमाणे

१) शेती, लघुउद्योग, कुटीर उद्योग तसेच निर्यात व्यापारासाठी पर्याप्त प्रमाणात कर्जाची व्यवस्था करणे.

२) अधिकोषावरील मोजक्या व्यक्तींचे नियंत्रण समाप्त करणे.

३) भांडवलाची आवश्यकता असणाऱ्या संघटकांना कर्जाचा पुरवठा करणे.

४) अधिकोषातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाची व्यवस्था करणे.

५) अधिकोषांच्या व्यवस्थापनातील कौशल्य उंचावण्यासाठी कृषी आणि लघुउद्योग क्षेत्रातील व्यक्तींना व्यवस्थापनात सहभागी करुन घेणे.

**राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता**

**१) कृषी आणि लघुउद्योग क्षेत्राला बँकाद्वारे होणारा कर्ज पुरवठ्याचे कमी प्रमाण**

सुरुवातीच्या कालावधीत व्यापारी अधिकोष कृषी क्षेत्राला कर्ज देत नसत. १९६६-६७ मध्ये व्यापारी अधिकोषांनी दिलेल्या एकूण कर्जपुरवठ्यात केवळ ०.२ टक्के कर्ज कृषी

क्षेत्राला दिले होते. वास्तविक पाहता त्यावेळी राष्ट्रीय उत्पन्नातील कृषीचा वाटा ५२ टक्के होता. भारतातील कृषी व्यवसाय हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे या क्षेत्राला पुरेसे कर्ज घायला हवे होते. परंतु व्यापारी अधिकोषांनी कृषीला नगण्य स्वरुपाचे कर्ज दिले होते. याचप्रमाणे लघु उद्योगांना सुद्धा अत्यंत कमी प्रमाणात कर्ज पुरवठा केला जात होता. त्यामुळे राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता होती.

### २) आर्थिक शक्तींचे केंद्रीकरण

राष्ट्रीयीकरणापूर्वी भारतातील व्यापारी अधिकोषांवर काही विशिष्ट उद्योगपतीचेंच वर्चस्व होते. राष्ट्रातील लोकांनी बचत करुन बँकामध्ये ठेवी जमा केलेल्या होत्या. परंतु या पैशातून अधिकोष फक्त मोठ्या व्यापारांना आणि उद्योगपतीनांच कर्ज देत त्यामुळे आर्थिक शक्तीचेच केंद्रीकरण होत होते. त्यामुळे राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता होती.

### ३) ग्रामीण भागात अधिकोषांचा शाखा विस्तार

राष्ट्रीयीकरणापूर्वी व्यापारी अधिकोषांच्या शाखा मुख्यत: शहरी भागातच स्थापन झालेल्या होत्या. त्यामुळे ग्रामीण भागात अधिकोषण विषयक सोयींचा अभाव होता. राष्ट्रीयीकरणापूर्वी भारतातील अधिकोषण विषयक सोयींचा असंतुलित विकास हा दोष दूर करण्यासाठी राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता होती.

### ४) पंचवार्षिक योजनांना सहकार्य

१९५१ पासून भारतात नियोजनाला सुरुवात झाली. या नियोजनात लघु व कुटीर उद्योगांना प्रामुख्याने प्राधान्य देण्यात आले. परंतु राष्ट्रीयीकरणापूर्वी मोठ्या उद्योगांनाच कर्ज पुरवठा केला जाई. परंतु आर्थिक विकासात ज्या उद्योगांना प्राधान्य देण्यात आले त्या लघु

व कुटीर उद्योगांना कर्ज पुरवठा करीत नसत. अधिकाषांच्या या कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता होती.

**५) संचालकांद्वारे संपत्तीचा गैरवापर**

अधिकोषाचे संचालक जनतेकडून मिळालेल्या ठेवींवर स्वत:चा स्वार्थ असलेल्या उद्योगांनाच कर्ज देत असत. त्यामुळे जनतेच्या पैशातून जनतेचे हीत होण्याऐवजी थोड्या एकाधिकाऱ्यांचेच हीत होऊ लागले. जनतेचा पैसा जनतेच्या हिसासाठीच उपयोगात यावा यासाठी राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता होती.

**६) अधिकोषांच्या ठेवीत वाढ**

इतर देशातील अधिकोषांच्या ठेवीत राष्ट्रीयीकरणानंतर वाढ झाली होती. भारतातसुद्धा अशाच प्रकारे अधिकोषांच्या ठेवी वाढतील अशी अपेक्षा होती. त्यासाठी राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता होती.

**७) साधन संपत्तीस गतीक्षम करण्यात अधिकोष अयशस्वी**

देशातील बचती गतीक्षम करुन त्यांचा देशाच्या आर्थिक विकासात वापर करुन घेण्यात अधिकोष अयशस्वी झाले होते. कारण देशातील ग्रामीण भागातील बचती या अधिकोषामध्ये येऊन विकासास हातभार लावू शकत नव्हत्या कारण व्यापारी अधिकोषांच्या शाखा ह्या फक्त शहरी भागातच होत्या. त्यामुळे ग्रामीण भागात अधिकोष सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता होती.

**राष्ट्रीयीकरणानंतर भारतातील व्यापारी अधिकोषांची प्रगती (Progess of Indian Commercial Bank after Nationalization)-**

राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी अधिकोषांच्या विकासाला चालना मिळाली व हा विकास कशा प्रकारे घडून आला हे पुढीलप्रमाणे

**१) अधिकोषांच्या शाखांचा विस्तार**

जलद गतीने आर्थिक विकास करण्यासाठी व्यापारी अधिकोषांचा शाखा विस्तार होणे आवश्यकच होते. जून १९६९ मध्ये अनुसूचित व्यापारी अधिकोषांच्या ८२६२ शाखा होत्या. जून २००० मध्ये ६४८३४ पर्यंत वाढल्या. त्यात ग्रामीण भागात १९६९ जूलै मध्ये १८६० असलेल्या अधिकोषांच्या संख्येत वाढ होवून ती २००० पर्यंत ३२,७०९ इतकी झाली.

**२) ठेवींमध्ये वाढ**

जुलै १९६९ मध्ये भारतातील १४ प्रमुख व्यापारी अधिकोषांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर ह्या अधिकोषांच्या ठेवींमध्ये वाढ घडून आली. जुलै १९६९ मध्ये अधिकोषांच्या एकूण ठेवी ४६६५ कोटी रुपयांच्या होत्या त्या २००० पर्यंत ९,३१,६७७ कोटी रुपयांपर्यंत वाढलेल्या होत्या. भारतातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या राज्यात देखील ठेवींचा विस्तार समाधानकारकरित्या होता. ही अधिकोषांच्या यशस्वीतेच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाची बाब होय.

**३) कर्ज पुरवठ्यात वाढ**

राष्ट्रीयीकरणाचा उद्देश विकासकार्यासाठी अधिकोषाद्वारे प्रत्यय पुरवठा व्हावा हा होता. प्रामुख्याने पंचवार्षिक योजनांमध्ये ज्या क्षेत्रांना प्राथमिकता देण्यात आली त्या क्षेत्रांना पुरेसा प्रत्यय पुरवठा उपलब्ध व्हावा हा उद्देश होता. व्यापारी अधिकोषांच्या राष्ट्रीयीकरणानंतर अधिकोषाच्या कर्ज पुरवठ्यात पुरेशी वाढ झाली आहे. जून १९६९ मध्ये दिलेल्या कर्जाची

एकूण रक्कम ३३९९ कोटी रु. होती. ती २००१ मध्ये ५,११,४३४ कोटी रुपयांपर्यंत वाढली. ही वाढ १५० पट आहे.

राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी अधिकोषांनी कृषी, लघुउद्योग या अग्रक्रम क्षेत्रांना मोठ्या प्रमाणावर कर्ज देणे सुरु केल्यामुळे २००० मध्ये या कर्जाचे प्रमाण ३५.१ टक्क्यांपर्यंत वाढलेले होते. अशा प्रकारे बँकांनी विकास धोरणात निश्चित केलेल्या अग्रक्रम क्षेत्रांना कर्ज देण्याचे धोरण स्विकारले आहे.

### ४) अग्रणी बँक योजना

राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी अधिकोषांनी आपले महत्तम नफा मिळविण्याचे उद्दिष्ट बाजूला सारुन आर्थिक विकासाला हातभार लावण्याचे कार्य करित आहे. रिझर्व्ह बॅकेच्या नरिमन समितीच्या शिफारशी स्वीकृत करुन अग्रणी बॅक योजना “Lead Bank Scheme” तयार करण्यात आली. ह्या योजनेअंतर्गत देशातील जिल्हे १४ अधिकोषांना वाटप करण्यात आले. व या जिल्ह्यांना प्रत्यय पुरविण्याची व ठेवी गतिक्षम करण्याची व जिल्ह्यांच्या योजनांना हातभार लावण्याचे कार्य सोपविले गेले.

### राष्ट्रीयीकरणानंतरच्या काळातील बॅकाच्या प्रगतीचे मूल्यमापन (Appraised of Banking after Nationalazation)-

१९६९ मध्ये व्यापारी अधिकोषाचे राष्ट्रीयीकरणानंतर केल्यानंतर अधिकोषाचा शाखा विस्तार, ठेवी प्राप्त करणे, ग्राहकांना कर्ज देणे यात बरीच प्रगती केलेली आहे. परंतु निर्धारित उद्दिष्टे पूर्ण केली किंवा नाही यावरुनच व्यापारी अधिकोषांच्या राष्ट्रीयीकरणानंतरच्या प्रगतीचे योग्य मूल्यमापन होऊ शकेल. म्हणून वस्तुनिष्ठ मूल्यमापनासाठी नकारात्मक बाजूंचा विचार करणे योग्य होईल.

## व्यापारी अधिकोषांच्या नफ्यात घट

१९६९ मध्ये व्यापारी अधिकोषांच्या राष्ट्रीयीकरणानंतर गुंतवण व प्रत्यय या संदर्भात निर्देशिक कार्यक्रम लागू करण्यात आला. या कार्यक्रमानुसार गुंतवण करण्याची विशिष्ट पद्धती व कर्ज देतांना विशिष्ट प्राधान्यक्रमानुसारच द्यावयाची होती. याचा परिणाम अधिकोषांच्या नफ्यावर झाला. व अधिकोषांच्या नफ्याचे प्रमाण घटले. १९९२–९३ मध्ये नफ्याच्या नवीन मानदंडाप्रमाणे स्टेट बॅक व तिच्या सहाय्यक बँकाच्या नफ्याचे प्रमाण घटले याचे सविस्तर विवेचन पुढील प्रमाणे

१९८० मध्ये अंदाजपत्रकातील तूट भरुन काढण्यासाठी सरकारला रिझर्व्ह बॅक व व्यापारी कर्जे घ्यावी लागली. त्यामुळे अर्थव्यवस्थेत मुद्रास्फितीची परिस्थिती निर्माण झाली यावर नियंत्रण ठेवण्यासाठी बॅकांना आपल्या रोखतेच्या प्रमाणात वाढ करावी लागली व बॅकांना आपला पैसा कमी व्याज देणाऱ्या सरकारी रोख्यांमध्ये गुंतवावा लागला.

१९६९ च्या राष्ट्रीयीकरणानंतर बॅकांना कृषी, लघुउद्योग, कुटीर उद्योगांना कर्जपुरवठा करण्याचे निर्देश देण्यात आले होते. यात काही प्रमाणात यशही प्राप्त झाले. परंतु ही कर्जे देणे बॅकांच्या दृष्टीने महागात पडली. ही कर्जे देतांना पुरेसे तारणही न घेता देण्यात आली होती. व दिलेल्या कर्जाची परतफेडही वेळेवर केली जात नाही तसेच ग्रामिण भागातील युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने बॅकांना निर्देश देण्यात आले होते. त्यातही कर्ज घेणाऱ्यांची योग्यता व त्याच्या प्रकाराची सक्षमता न पाहाताच देण्यात आली. त्यामुळे बरीचशी कर्जे वसूल झाली नाही त्यामुळे बॅकांचा नफाही घटला.

कृषी, लघु व कुटीर उद्योगांना सवलतीच्या दराने केलेला कर्ज पुरवठा हा देखील बॅकांना झालेल्या तोट्यासाठी कारणीभूत आहेत. तसेच राष्ट्रीयीकरणानंतर बॅकांच्या प्रशासकीय खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने देखील बॅकांची लाभप्रदता कमी झाली

आहे. अधिकोषांचा खर्च वाढण्यामागे अधिकोषांनी अनेक शाखा सुरु केल्या, त्यासाठी नवीन कर्मचाऱ्यांची भरती, मुद्रास्फितीमुळे कर्मचाऱ्यांची वेतनातील वाढीची मागणी, आवश्यकतेपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती या सर्व कारणांमुळे अधिकोषांच्या खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

थोडक्यात, वरील कारणांमुळे अधिकोषांची लाभप्रदता कमी झाली अधिकोषांचा संख्यात्मक विकास झाला असला तरी गुणात्मक विकास झाला नाही. ग्राहकांना योग्य त्या सेवा पुरविण्यात व्यापारी अधिकोष कमी पडले.

## अपेक्षित प्रश्न

### दिर्घोत्तरी प्रश्न

१. राष्ट्रीयीकरणानंतरच्या व्यापारी अधिकोषांच्या प्रगतीचा आढावा घ्या.

२. व्यापारी अधिकोषाच्या राष्ट्रीयीकरणाचे गुण—दोष सांगा.

### लघुत्तरी प्रश्न

१. व्यापारी अधिकोषाचे राष्ट्रीयीकरण का करण्यात आले?

२. व्यापारी अधिकोषाच्या राष्ट्रीयीकरणाचे दोष स्पष्ट करा.

३. व्यापारी अधिकोषाच्या राष्ट्रीयीकरणाचे गुण स्पष्ट करा.